**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
१९ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

क्र. साप्रवि-१२०२२/१७/२०२६-माहिती (कक्ष-६) दिनांक:- ०२ एप्रिल,२०२६

प्रति,

सह/उप सचिव (क्षेत्रीय आस्थापना)
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय,मुंबई

**विषय:-** सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखालील राज्य माहिती आयोगातील विविध रिक्त पदे क्षेत्रीय कार्यालयामधून प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत...

**संदर्भ:-** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.१३७/ कार्यासन-१२, दि.१७.१२.२०१६.
२.सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.५१०/ कार्या १२, दि. १६.०२.२०१८.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय.क्र.रामाआ २०१७/प्र.क्र.१०/सहा, दि.२१.०६.२०२३.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन पुरकपत्र,क्र.१२०२२/१५/२०२५,कक्ष-६, दि.३१.०७.२०२५

महोदय/महोदया,

संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती, आणि नियुक्तीची कार्यपध्दती याबाबतचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. सदर धोरणामध्ये संदर्भाधीन क्र.२ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. संदर्भाधीन क्र.३ च्या शासन निर्णयान्वये राज्य माहिती आयोगाच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे व संदर्भाधीन क्र.४ च्या शासन पुरक पत्रान्वये त्यामध्ये सुधारणा करण्यात आली असून राज्य माहिती आयोगातील पदे क्षेत्रिय कार्यालयातील समकक्ष पद धारण करणाऱ्या अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने भरण्याची तरतुद करण्यात आली आहे.

२. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयातील उप सचिव/कक्ष अधिकारी/ सहायक कक्ष अधिकाऱ्यांची पुढील तक्त्यातील रिक्त असलेली पदे राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयातील उप सचिव/कक्ष अधिकारी/सहायक कक्ष अधिकारी या पदांचे समतुल्य पद धारण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरावयाची आहेत.

| अ. क्र. | पदनाम व वेतनस्तर | राज्य माहिती आयोगाचे कार्यालय व भरावयाची पदसंख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुख्यालय, मुंबई | बृहंन्मंबई | पुणे | कोंकण | छत्रपती संभाजी नगर | अमरावती | नागपूर | नाशिक |
| १ | उप सचिव (एस -२५) | - | १ | - | - | - | - | - | १ |
| २ | कक्ष अधिकारी (एस- १७) | १ | २ | २ | १ | २ | २ | १ | - |
| ३ | सहायक कक्ष अधिकारी (एस -१४ ) | २ | ३ | २ | ४ | २ | ४ | २ | ४ |
| **एकूण** | | **३** | **६** | **४** | **५** | **४** | **६** | **३** | **५** |

३. वरील पदांकरिता राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयातील उप सचिव/कक्ष अधिकारी/सहायक कक्ष अधिकारी या पदांचे समतुल्य पद धारण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून इच्छुकता मागविण्यात येत आहे. तथापि, संबंधित संवर्गात इच्छुक किंवा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास निम्न संवर्गात व श्रेणीमध्ये समकक्ष पदावरील पदोन्नतीसाठी विहित केलेली अहर्ता व अनुभव पूर्ण करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचाही या पदावर प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाईल.

४. उपरोक्त नमूद पदे राज्य शासनाच्या कोणत्याही कार्यालयातील उप सचिव/कक्ष अधिकारी/सहायक कक्ष अधिकारी या पदांचे समतुल्य पद धारण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून प्रतिनियुक्तीने भरण्याकरिता सदर जाहिरात प्रसिध्द करण्यात येत असल्याने या जाहिरातीस क्षेत्रीय कार्यालयातील अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी सदर पदांकरिता मूळ प्रशासनिक विभागामार्फत या विभागाकडे अर्ज सादर करावेत. तसेच सदर अर्जाची एक प्रत या कार्यासनास सादर करावी.

५. संबंधित प्रशासकीय विभागांनी उपरोक्त पदांसाठी इच्छुकता दर्शविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे अर्ज/प्रस्ताव सदर पत्रासोबत जोडलेल्या विहित विवरणपत्रातील परिपूर्ण माहिती मागील ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या प्रतीसह या कार्यासनाकडे (सा.प्र.वि./ माहिती (कार्या-६) दि.०५.०५.२०२६ पर्यंत सादर करावेत. तसेच उक्त पदांसाठी एकदा दर्शविण्यात आलेली इच्छुकता परत मागे घेता येणार नाही.

६. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सदर जाहिरात त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रीय कार्यालयाच्या निदर्शनास आणावी.

७. सदर पत्राची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४०२१६४१३४३९०७ असा आहे. सदर पत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

आपला,

Digitally signed by HEMANT ANANT MAHAJAN
Date: 2026.04.02 16:44:10 +05'30'

**(हेमंत महाजन)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

**कार्यासन ६ — संग्रहार्थ**

**प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठीचा विहित विवरणपत्राचा नमुना**

| अ.क्र. | मुद्दा | तपशील/अभिप्राय |
|---|---|---|
| १. | अधिकारी/कर्मचाऱ्याचे संपूर्ण नाव | |
| २. | सध्या धारण केलेले पद व त्या पदाची वेतनश्रेणी | |
| ३. | सध्याच्या कार्यालयाचे नांव व पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| ४. | जन्मदिनांक | |
| ५. | प्रथम नियुक्तीचा दिनांक | |
| ६. | सेवानिवृतीचा दिनांक | |
| ७. | शैक्षणिक अहर्ता | |
| ८. | भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ९. | ज्या पदासाठी इच्छुकता आहे ते पद | |
| १०. | मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या साक्षांकीत प्रती (मूळ गोपनीय अहवाल पाठवू नयेत) | |

| | | |
|---|---|---|
| ११. | मत्ता व दायित्वे वार्षिक विवरणपत्र सादर केले आहे किंवा कसे | |
| १२. | ५० / ५५ व्या वर्षी पुनर्विलोकन केले आहे का ? (लागू असल्यास) | |
| १३. | प्रतिनियुक्तीने नियुक्ती संदर्भातील सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ व दि.१६/०२/२०१८ मधील तरतूदीनुसार सदर अधिकारी/कर्मचारी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यास पात्र आहे किंवा कसे | |
| १४. | संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचार/ लाचलुचपत गुन्यासंदर्भातील प्रकरणे, फौजदारी प्रकरण, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ च्या नियम ८ खाली विभागीय चौकशी सुरु आहे किंवा शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे किंवा कसे. | |
| १५. | प्रतिनियुक्तीने नियुक्ती संदर्भातील सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ व दि.१६/०२/२०१८ अन्वये आपल्या विभागाचे/कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र. | |